## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 11/03/2020 (बुधवार)
## (सकाळ)

---

### काटोल परिसरात जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कार्यवाही
### 30 आरोपींसह एकुण 25,69,190/- रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक 10/03/2020 रोजी होळी व धुलीवंदन उत्सव संबंधाने प्रोव्हीशन जुगार रेड करीता काटोल उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना मौजा कोहळा शिवारात गुप्त बातमीदारा कडुन स्थानिक गुन्हे शाखेला खात्रीशीर खबर मिळाली की, मौजा कोहळा शिवारातील मोहम्मद रियाज यांचे शेतामध्ये अंदाजे 25 ते 30 इसम हे तासपत्यांवर पैशांची बाजी लावुन जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळत आहे अशा खबरे वरून पंच व पोलीस स्टॉफ असे मिळुन मिळालेल्या माहीती प्रमाणे मौजा कोहळा शिवारातील मोहम्मद रियाज यांचे शेतात गेले असता शेतातील टिनचे शेड जवळील झाडा खालील खुल्या जागेत खाली ताडपत्री टाकुन त्यावर बसलेले इसम दिसुन आले. सदर ठिकाणी पंचासह छापा टाकला असता त्या ठिकाणी काही इसम हे तासपत्यांवर जुगाराचा खेळ खेळत असतांना मिळुन आले. मिळुण आलेल्या इसमांनी नावे अनुक्रमे 1) मोहम्मद शमीम मोहम्मद जाकिर, 2) अब्दुल गणी अब्दुल अजिज, 3) मोहम्मद उसमान मोहम्मद इस्माईल, 4) शेख वसीम शेख मेहमुद, 5) शेख अल्ताफ अब्दुल सत्तार, 6) सैफ युसुफ खान, 7) शेख इरफान शेख बशीर, 8) शेख शाकीर अब्दुल रज्जाक, 9) शेख इरफान शेख रफीक, 10) मोहम्मद मुमताज शेख मेहबुब, 11) शेख सिराज शेख अजिज, 12) राहील वसिम शेख, 13) मोहम्मद शरीफ मोहम्मद फारूख, 14) शेख रफीक अब्दुल रज्जाक, 15) मोम्मद रियाज मोहम्मद इब्राहीम, 16) मोहम्मद परवेज ताज मोहम्मद, 17) मोहम्मद सरफराज मोहम्मद शेख मेहबुब, 18) मोहम्मद नौशाद इलियाज राहील, 19) मोहम्मद समी मोहम्मद शफी, 20) शफात अली सिध्दीक अली, 21) अफसर खान अस्लम खान, वय 34 वर्ष, 22) शेख लतिफ शेख रफीक, 23) मोहम्मद रिजवान शेख गरीबुल्लाह, 24) मोहम्मद रफत मोहम्मद इकबाल, 25) मोहम्मद दानिश अब्दुल हसन चौधरी, 26) शेख जावेद शेख सिकंदर, 27) मोहम्मद फाहरुख शेख नहीम राहील, 28) शेख नजिर शेख जमाल, 29) शब्बीर खान रहीम खान, 30) गुलफाम गुलाम कादर सर्व रा. इतवारी, दहीबाजार, नागपूर असे एकुण 30 आरोपी ताब्यात घेतले असुन घटनास्थळावरून डावावरील व आरोपींच्या अंगझडतीत नगदी 1,77,790/-रू ची रोख रक्कम, एकुण 28 मोबाईल संच किं. 1,38,000/-रू, साहीत्य ( खुर्च्या, ताडपत्री, तासपत्यांचे पॅकेट ) किं. 3400/-रू, 3 चार चाकी वाहने किं. 22,50,000/-रू असा एकुण 25,69,190/-रू चा माल मुद्देमाल मिळुन आला. सदर इसमांविरूध्द पोस्टे काटोल येथे महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन आरोपींना पुढील कायदेशीर कार्यवाही कामी पोस्टे काटोल यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, पोउपनि नरेंद्र गौरखेडे, सहा.फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, सुनिल मिश्रा, दुर्गाप्रसाद पारडे, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, बालाजी साखरे, चालक सहा. फौजदार साहेबराव बहाले, चालक पोलीस नायक अमोल कुथे यांनी पार पाडली.





## चोरीचा प्रयत्न

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर आयएमटी कॉलेज डी होस्टेल डोरली भिंगारे शिवार येथे दिनांक 10/03/2020 चे 01.10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सचिन दशरथराव चचाने, वय 34 वर्ष, रा. डोरली भिंगारे ता. काटोल हे आयएमटी कॉलेज डोरली भिंगारे येथे सेक्युरिटी सुपारवायझर पदावर काम करतात. फिर्यादी हे सोबतच्या सुरक्षा गार्डसह कॉलेजच्या आतमध्ये गस्त करीत असता डी होस्टेल च्या आतमध्ये आरोपी नामे– फारूख शेख, रा. मोहपा (कर्मचारी आयएमटी कॉलेज) रूम नं. 206 मध्ये ईलेक्ट्रीक प्रेस व नगदी पैसे चोरी करतांना मिळून आला. आरोपीला फिर्यादीने पकडून विचारपूस केली असता ईलेक्ट्रीक प्रेस व पैसे चोरी करण्याकरीता होस्टेलच्या रूममध्ये आला होता, असे सांगीतले आरोपी हा चोरीचा प्रयत्न करतांना मिळून आला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 380, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कामडी 9923123397 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 10/03/2020 चे 16.00 वा. दरम्यान 22 वर्षीय फिर्यादी/पीडित हि घरी हजर असतांना आरोपी नामे– शिवपुजन गेंदु राम, वय 55 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 वलनी झोपडपट्टी याने तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अंधारे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर